# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः06.07.2025** **वारःरविवार**

---

•अर्जेंटिनाच्या यशस्वी दौऱ्यानंतर पंतप्रधान मोदी ब्राझीलमध्ये दाखल; १७व्या ब्रीक्स परिषदेत सहभागी होणार

•आषाढी एकादशीचा महाराष्ट्रात उत्साह; पंढरपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शासकीय महापूजा

•बर्मिंगहॅम क्रिकेट कसोटीत भारत मजबूत स्थितीत

आणि

•आगामी पाच सहा दिवसात देशाच्या विविध भागात मुसळधार पावसाचा अंदाज

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज त्यांच्या पाच देशांच्या दौऱ्याच्या चौथ्या टप्प्यात ब्राझीलमधील रिओ डी जानेरो इथं पोहोचले. या दौऱ्यादरम्यान, मोदी १७ व्या ब्रिक्स शिखर परिषदेला उपस्थित राहणार आहेत. शिखर परिषदेदरम्यान, पंतप्रधान जागतिक प्रशासनात सुधारणा, शांतता आणि सुरक्षा, बहुपक्षीयता बळकट करणे, कृत्रिम बुद्धिमत्तेचा जबाबदार वापर, हवामान कृती, जागतिक आरोग्य आणि आर्थिक बाबी यासारख्या प्रमुख जागतिक मुद्द्यांवर विचार विनिमय करतील. शिखर परिषदेच्या निमित्तानं पंतप्रधान अनेक द्विपक्षीय बैठका घेण्याची शक्यता आहे.

त्यानंतर मोदी ब्राझीलियाला देखील जातील. तिथं ते दोन्ही देशांमधील व्यापार, संरक्षण, ऊर्जा, अंतराळ, तंत्रज्ञान, शेती, आरोग्य आणि दोन्ही देशांमधील जनतेचे संबंध दृढ करणे यासारख्या परस्पर हिताच्या क्षेत्रात धोरणात्मक भागीदारी वाढविण्यावर राष्ट्रपती लुईझ इनासियो लुला दा सिल्वा यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील.

तत्पूर्वी मोदी यांनी ब्यूनोस आयर्स इथं अर्जेंटिनाचे अध्यक्ष हॅविअर मिले यांची काल भेट घेतली. भारतीय पंतप्रधानांचा ५७ वर्षांमधील अर्जेंटिनाचा हा पहिलाच द्विपक्षीय दौरा होता. दोन्ही नेत्यांच्या संक्षिप्त बैठकीनंतर द्विपक्षीय संबंधांवर प्रतिनिधीमंडळ पातळीवर सर्वसमावेशक चर्चा झाली. व्यापार आणि वाणिज्य, तंत्रज्ञान, संरक्षण, अवकाश, आरोग्य आणि औषधनिर्माण यासारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्यावर आणि दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारी आणखी दृढ करण्यावर त्यांनी सहमती दर्शविली.

**बिर्ला**

लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी भारताच्या आरोग्यसेवा प्रणालीसंदर्भात गुणात्मक, सुलभ आणि परवडणाऱ्या दर्जाचे कौतुक केलं आहे. नवी दिल्ली इथं इनोव्हेटिव्ह फिजिशियन्स फोरम – अर्थात आयपीएफ मेडिकॉन २०२५ च्या ७ व्या वार्षिक आंतरराष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन करताना ते काल बोलत होते. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय गरजा पूर्ण करणाऱ्या आरोग्यसेवेतील प्रगतीमध्ये देशातील कुशल शास्त्रज्ञ, मजबूत संशोधन पायाभूत सुविधा आणि नवोपक्रमाची वचनबद्धता महत्त्वपूर्ण योगदान देत असल्याचं ते म्हणाले.

**अमित शहा**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या हस्ते काल गुजरातमधील आणंद इथं त्रिभुवन सहकारी विद्यापीठ या देशातील पहिल्या सहकारी विद्यापीठाची कोनशीला बसवण्यात आली. गेल्या चार वर्षांत सहकार मंत्रालयानं 60 नवीन उपक्रम सुरू केले असून कोट्यवधी गरीब आणि ग्रामीण लोकांच्या जीवनात आशा निर्माण करण्यासाठी सहकार मंत्रालयाची स्थापना करण्यात आल्याचं प्रतिपादन शाह यांनी यावेळी केलं.

**गवई**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं व्यक्तिमत्त्व विधिज्ञ, अर्थतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ असे बहुआयामी होते; शिक्षण क्षेत्रातील बहुमोल योगदानाबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अध्यापन कारकीर्दही मोलाची आणि प्रेरणादायी आहे, असं प्रतिपादन सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी केलं. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्राध्यापक आणि प्राचार्य, कारकीर्दीला 90 वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त मुंबईमध्ये शासकीय विधी महाविद्यालय इथं स्मृतीपटलाचं अनावरण आणि सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण आर. गवई यांच्या सत्कार समारंभाचं आयोजन करण्यात आलं होतं; त्यावेळी ते बोलत होते.

**आषाढी**

पांडुरंगाने राज्यावरची संकट दूर करण्याची शक्ती द्यावी, सन्मार्गाने चालण्याची सुबुद्धी द्यावी, बळीराजाला सुखी समाधानी करण्याकरता आशीर्वाद द्यावा, असं साकडं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विठ्ठलाला घातलं. आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर इथं आज पहाटे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सपत्नीक श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा केली; यंदाचे मानाचे वारकरी कैलास उगले आणि कल्पना उगले यांनीही त्यांच्यासमवेत विठ्ठलाची महापूजा केली. त्यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला; त्यावेळी फडणवीस बोलत होते.

आषाढी एकादशीसाठी पंढरपुरात मोठ्या प्रमाणावर विठ्ठल भक्त दाखल असून त्यांच्या सोयीसाठी पंढरपूर पालिकेनं जय्यत तयारी केली आहे. प्रशासनातर्फे चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. पंढरपुरात नगर

प्रदक्षिणा मार्ग, नामदेव पायरी, विठ्ठल मंदिर परिसर गर्दीनं फुलून गेला आहे. मंदिराला फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली आहे.
राज्यात सर्वत्र आज आषाढी एकादशीचा उत्साह आहे. ठीकठिकणच्या विठ्ठल मंदिरांमध्ये पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली आहे.

**<u>मुहर्रम</u>**
देशाच्या विविध भागात आज अशूरा-ए-मुहर्रम निमित्त ताजिया मिरवणूक काढण्यात येणार आहे. हा दिवस प्रेषित मुहम्मद यांचे नातू हजरत इमाम हुसेन आणि त्यांच्या साथीदारांच्या हौतात्म्याचा दिवस आहे, ज्यांनी करबलामध्ये सत्य, नीतिमत्ता आणि न्यायाचे रक्षण करण्यासाठी आपले प्राण अर्पण केले.

**<u>श्यामाप्रसाद</u>**
ज्येष्ठ विचारवंत आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे. देशाच्या सन्मान, प्रतिष्ठा आणि अभिमानाचं रक्षण करण्यासाठी डॉ. मुखर्जी यांनी आपलं जीवन समर्पित केलं. विकसित आणि स्वावलंबी भारताच्या उभारणीत डॉ. मुखर्जी यांचे आदर्श आणि तत्त्वे अमूल्य आहेत. असं मोदी यांनी समाज मध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>क्रिकेट</u>**
इंग्लंडमधल्या बर्मिंगहॅम इथं सुरू असलेल्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेच्या दुसऱ्या सामन्याच्या कालच्या चौथ्या दिवशी भारतानं कर्णधार शुभमन गिलच्या दीड शतकाच्या तसंच ऋषभ पंत आणि रविंद्र जडेजाच्या तडाखेबंद अर्धशतकांच्या जोरावर 6 बाद 427 धावांवर आपला दुसरा डाव घोषित केला. पहिल्या डावातील भारताच्या 180 धावांच्या आघाडीमुळं इंग्लंडसमोर विजयासाठी 608 धावांचं लक्ष्य असून काल चौथ्या दिवसअखेर इंग्लडच्या 3 बाद 72 धावा झाल्या होत्या. आकाशदीपनं दोन तर मोहम्मद सिराजने 1 गडी बाद केला. विजयासाठी भारताला आज सामन्याच्या शेवटच्या दिवशी 7 बळींची आवश्यकता आहे.

**<u>नीरजचोप्रा</u>**
ऑलिंपिक सुवर्णपदक विजेता नीरज चोप्राने काल बेंगळुरू इथे झालेल्या नीरज चोप्रा क्लासिक २०२५ - ए वर्ल्ड ॲथलेटिक्स गोल्ड-लेव्हल इव्हेंटच्या पहिल्या आवृत्तीत विजेतेपद पटकावलं. त्याने ८६ पूर्णांक १८ शतांश मीटरच्या सर्वोत्तम थ्रोसह विजेतेपद पटकावलं. केनियाचा ज्युलियस येगो हंगामातील ८४ पूर्णांक ५१ शतांश मीटरच्या सर्वोत्तम प्रयत्नासह दुसऱ्या क्रमांकावर राहिला, तर श्रीलंकेचा रुमेश पाथिराज ८४ पूर्णांक ३४ शतांश मीटरच्या थ्रोसह तिसऱ्या क्रमांकावर राहिला.

फुटबॉलमध्ये, चियांग माई स्टेडियमच्या ७०० व्या वर्धापन दिनानिमित्त झालेल्या चौथ्या आणि शेवटच्या एएफसी महिला आशियाई कप २०२६ पात्रता गट ब सामन्यात भारतीय संघानं यजमान थायलंडचा २-१ असा पराभव केला. या विजयानंतर भारत पुढील वर्षीच्या मुख्य स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

टेनिसमध्ये, भारताचा युकी भांब्री आणि त्याचा अमेरिकन जोडीदार रॉबर्ट गॅलोवे यांनी काल लंडनमध्ये सुरू असलेल्या विम्बल्डन २०२५ ग्रँड स्लॅममधील विजयानंतर पुरुष दुहेरीच्या तिसऱ्या फेरीत प्रवेश केला.

**शोक**

अमेरिकेतील टेक्सासमध्ये आलेल्या विनाशकारी पुरामुळं झालेल्या जीवितहानीबद्दल, विशेषतः मुलांच्या मृत्युबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं आहे. समाज माध्यमातील संदेशात, मोदींनी अमेरिकन सरकार आणि शोकग्रस्त कुटुंबांप्रती आपल्या संवेदना व्यक्त केल्या आहेत. टेक्सासमधील या पुरामुळे १८ प्रौढ आणि १४ मुलांसह ३२ जणांचा मृत्यू झाला असून 27 जण बेपत्ता आहेत.

**पाऊस**

गेल्या काही दिवसांत मुसळधार पाऊस, भूस्खलन आणि ढगफुटीमुळे बाधित झालेल्या हिमाचल प्रदेशातील अनेक ठिकाणी मदत आणि पुनर्वसन सुरू आहे. एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि स्थानिक प्रशासन विविध स्वयंसेवकांसह, मदत आणि पुनर्वसनाचे प्रयत्न युद्धपातळीवर करत आहेत. उपमुख्यमंत्री मुकेश अग्निहोत्री यांनी काल मंडीला भेट दिल्यावर मंडी जिल्ह्यातील बगलामुखी रोपवे पुढील आदेशापर्यंत प्रवासी आणि माल वाहतुकीसाठी मोफत केल्याचं जाहीर केलं.

**हवामान**

पुढील ६ ते ७ दिवसांत वायव्य, मध्य आणि ईशान्य भारतात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली आहे. हिमाचल प्रदेश आणि मध्य महाराष्ट्रातील घाट भागात पुढील दोन दिवसांत अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असून उत्तराखंड, पूर्व राजस्थान मध्ये या महिन्याच्या ११ तारखेपर्यंत तर पूर्व उत्तर प्रदेश आणि पश्चिम राजस्थानमध्ये आज तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. या महिन्याच्या १० तारखेपर्यंत हरियाणा, चंदीगड, पंजाब आणि उत्तर प्रदेशात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुढील सात दिवसांत कोकण, गोवा आणि गुजरात मध्येही मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार